आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक १८ मार्च २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. नागपुरातला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज विधानसभेत इशारा.

2. नागपूर शहरात काल झालेल्या हिंसाचार प्रकरणी ५० जणांना अटक - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती, या प्रकरणी अफवा पसरवणाऱ्याचा शोध सुरू.

3. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना 15 व्या वित्त आयोग अनुदानापोटी 620 कोटींपेक्षा अधिक निधी मिळणार.

4. विधानपरिषद पोटनिवडणुकीत अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरल्यानं पाचही उमेदवारांची निवड बिनविरोध होणार.

<u>मुख्यमंत्री निवेदन</u>

नागपुरात काल झालेला हिंसाचार, पूर्वनियोजित असल्याचं, प्रथमदर्शनी दिसत असून, पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर, कडक कारवाई करू असा इशारा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, विधानसभेत दिला. काल रात्री नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल, मुख्यमंत्र्यांनी आज सभागृहात निवेदन दिलं. दरम्यान सर्वांनी शांतता आणि संयम ठेवण्याचं आवाहन, फडणवीसांनी केलं-

<u>*नागपुरातली जनता असेल. महाराष्ट्रातली जनता असेल या सर्व जनतेला ही विनंती करू इच्छितो की सर्व समाजांचे धार्मिक सण हे या कालावधीमधे चालले आहेत अशा या सगळ्या परिस्थितीमध्ये सगळ्याने संयम ठेवला पाहिजे. कोणीही संयम सोडू नये, आपल्याला कायदा आणि सुव्यवस्था आणि शांतता कशी राखता येईल, एकमेकांच्याप्रती आदर भाव कसा राखता येईल, अशा प्रकारचा प्रयत्न हा सर्वांनी करावा अशा प्रकारची यानिमित्ताने मी अपील करतो.*</u>

नागपूरच्या महाल परिसरात, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी, औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी केलेल्या आंदोलनात, गवताच्या पेंड्या असलेली प्रतीकात्मक कबर जाळली. त्यात जाळलेल्या कापडावर धार्मिक मजकूर असल्याची अफवा पसरल्यानंतर, शहराच्या विविध विभागात, हिंसाचार झाल्याचं,

मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. या प्रकरणी एकंदर पाच गुन्हे दाखल झाले असून, नागपुरातल्या, ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत, संचारबंदी लागू केली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या, पाच तुकड्या तैनात करण्यात, आल्या आहेत असंही, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. कोणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही अशी ग्वाही, मुख्यमंत्र्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही, नागपूरच्या घटनेबाबत विधानसभेत निवेदन दिलं. गेल्या काही दिवसांपासून, औरंगजेबाचं उदात्तीकरण राज्यात सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. त्याची कबर हटवण्यासाठी, नागपूरमध्ये आंदोलन झालं त्याला उत्तर, आंदोलनानं द्यायला हवं होतं मात्र, तिथं पूर्वनियोजित कट करून, विशिष्ट समुदायांना लक्ष्य केलं गेलं असा दावाही, शिंदे यांनी केला. राज्याच्या गृहखात्याचा कारभार, ज्या मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे त्यांना, आपल्या मूळ गावात उसळलेल्या, हिंसाचारा विषयी काहीच माहीत नाही अशी टीका, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते, अंबादास दानवे यांनी केली आहे.

<u>५० जणांना अटक– बावनकुळे</u>

नागपूर शहरात काल झालेल्या प्रकरणी, पोलिसांनी ५० जणांना अटक केली आहे. या प्रकरणी, अफवा पसरवणाऱ्याचा, शोध सुरू असून, दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल असं, नागपूरचे पालकमंत्री, चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितलं. या हिंसाचारात, ५ जण जखमी झाले असून, त्यातल्या दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हिंसाचार रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसां वरही, दगडफेक झाली असून, तीन पोलीस उपा-युक्तांसह, ३३ ते ३४ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. दरम्यान लोकांनी, पोलीस प्रशासनाला, तपासात सहकार्य करावं असं आवाहन, बावनकुळे यांनी केलं-

*<u>तो मेरा आह्वान पालकमंत्री करके है, सभी जनता को इसलिए मैं आया हूँ की जनता ने सबने साथ मिलकर ऐसे लोगों को ढूंढ के निकलना चाहिए। ऐसे लोगों की माहिती पुलिस को देनी चाहिए। माननीय मुख्यमंत्री जी इस विषय के ऊपर पूरा मॉनिटर कर रहे है, गृहमंत्री भी है। निश्चित रूप से वो कड़ा कदम उठाएंगे। मला वाटत सोशल मीडियाच्या ट्रैकिंग जेव्हा पूर्ण होईल टीडीआर जेव्हा हातात येतील तेव्हा खरं आपल्याला मुख्य आरोपहून जात येईल.</u>*

दरम्यान, या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, आज, शहरातल्या अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आल्याची माहिती, पोलीस आयुक्त, रविंदर सिंघल यांनी दिली आहे. नागपूरमध्ये

कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामबाडा, यशोधरा नगर आणि कपिल नगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत, संचारबंदी लागू करण्यात आली आहे. दरम्यान, नागपूर इथल्या कालच्या घटनेत जखमी झालेले पोलिस उपायुक्त, निकेतन कदम यांच्याशी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधला आणि लवकर बरे होण्यासाठी, त्यांना शुभेच्छा दिल्यात.

अनिल देशमुख

नागपूरच्या हिंसाचारामागे, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातीलच, काही मंत्र्यांची, वादग्रस्त विधानं असल्याचा आरोप, राज्याचे माजी गृहमंत्री, अनिल देशमुख यांनी केला. ते अकोला जिल्ह्यातील माध्यमांशी बोलत होते.

*सरकारमधलेच काही मंत्री सातत्याने असे काही व्यक्तत्वें देत असतात त्याच्यामुळे हिंदू मुस्लिमांमध्ये किंवा जाती धर्मामध्ये तणाव निर्माण करण्याचे काम त्यानिमित्ताने होत असत मुख्यमंत्र्यांनी हे असे काही दुषित वातावरण करण्याची त्यांच्या जवळचे लोक आहेत त्यांना तंबी दिली पाहिजे.*

दरम्यान, नागपुरात सर्वात आधी, शांतता प्रस्थापित होणे महत्त्वाचं आहे असं, अनिल देशमुख यांनी म्हटलं.

वेव्हज

मुंबईत होत असलेल्या, वेव्हज अर्थात, वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल, एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं, ई-स्पोर्ट्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ई-स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या या, ऑनलाईन स्पर्धेत, ई-फुटबॉल, WCC आणि BGMI या खेळांचे सामने राष्ट्रीय स्तरावर विविध टप्प्यात होणार आहेत. अधिक माहिती करता, वेव्हज इंडिया डॉट ओ.आर.जी, या संकेतस्थळाला, भेट देऊ शकता. वेव्हज ही जागतिक, दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद, मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था

2024-25 या आर्थिक वर्षातील, 15व्या वित्त आयोग अनुदानाची रक्कम, केंद्र सरकारनं, महाराष्ट्रातील, ग्रामीण भागातील, स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केली आहे. यामध्ये, 611.6 कोटी रुपयाचे, एकत्रित अनुदानाचा दुसरा हप्ता आणि पहिल्या हप्त्यातील एकत्रित अनुदानाच्या, 8.4 कोटी रुपयांचा समावेश आहे. राज्यातल्या पात्र ठरलेल्या 4 जिल्हा परिषदा, 40 पंचायत समित्या आणि 21 हजार 551, ग्राम पंचायतींना हा निधी दिला जाणार आहे. पंचायत राज संस्था / ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विशिष्ट स्थानिक गरजांसाठी हा एकत्रित निधी उपयोगात आणला जाईल. राज्य घटनेतील अकराव्या परिशिष्टात नमूद केलेल्या 29 विषयां संबंधीच्या या विशिष्ट, स्थानिक गरजा असतील मात्र यामध्ये वेतन आणि अन्य संस्थात्मक खर्चांचा समावेश नसेल. हे विहीत अनुदान मूलभूत सेवांसाठी वापरता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, विकसित पंचायत से विकसित भारत या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या अनुदानामुळ, ग्रामीण पातळीवर लोकशाही सुदृढ होते आणि ग्रामीण विकासाला गती मिळनं शक्य होणार आहे.

विकास ठाकरे

मागील शनिवारी नागपूरच्या, दक्षिण-पश्चिम क्षेत्रात येणाऱ्या, अभ्यंकर नगर परिसरात, एका मद्यपी युवकांनं, दहापेक्षा अधिक नागरिकांच्या वाहनांची तोडफोड करून स्थानिक रहिवाशांमध्ये दहशत निर्माण केल्याचा मुद्दा आज काँग्रेस नेते विकास ठाकरे यांनी मांडला. या युवकाला पोलिसांनी, बेलेबल वॉरंट देऊन, दुसऱ्या दिवशी, जामीन देऊन सोडल्याचं देखील ते म्हणाले. याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे -

*रात्री सव्वा दहा वाजता तिथले नागरिक पोलीस स्टेशनला गेले. मला व्हॉट्स अप वर त्या गाडीचा नंबर पाठवला मी तो नंबर डीसीपीना पाठवला. दोन तास कारवाई झाली नाही दोन तासानंतर त्या युवकाने आठ दहा लोक घेऊन आला आणि जवळपास दहा फोर व्हीलरचं नुकसान केलं. वस्तीत धुमाकुळ घालून त्या आठ लोकांनी दहा फोर व्हीलर तोडल्या.*

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीनं याची दखल घेत, चौकशीचे आदेश दिले असून, संबंधित दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असं, आश्वासन दिलं आहे.

## बीजोत्सव

येत्या 21 ते 23 मार्च दरम्यान नागपुरात, वनामती इथं बीजोत्सव समूहाद्वारे नागपूर बीजोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी शेतीचं पारंपारिक ज्ञान, कृषी परिसंस्थेचा विचार या विषयावर विविध सत्र, परिसंवाद, प्रकट मुलाखती होणार असून, याठिकाणी प्रवेश निशुल्क आहे. सकाळी नऊ ते रात्री दहा वाजेपर्यंत, बीजोत्सव खुला असणार आहे.

## निवड बिनविरोध

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठीच्या पोट निवडणुकीत, एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज, बाद ठरला आहे. त्यामुळ भाजपाचे संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी या पाच उमेदवारांची, निवड बिनविरोध होणार आहे.

******